निवडक



## सालेली येथे आज कालोत्सव

टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २९ :** सालेली सत्तरी येथील श्री सिद्धेश्वर, श्री सातेरी, केळबाय, म्हाळसाय, ब्राह्मणी, जोगेश्वरी, पांजणमाया पंचायतन देवस्थानचा कालोत्सव गुरुवार दि. ३० रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. यानिमित्त सकाळी विविध धार्मिक विधी,संध्याकाळी स्थानिक कलाकारांचे भजन व रात्री दशावतारी नाट्यप्रयोग होणार आहे. तसेच देणगी कुपन विक्रिचा शुभारंभ होईल, असे देवस्थान समितीने कळविले आहे. भाविकांनी या कालोत्सवास मोठ्या संख्येने उपस्थिती लावावी, असे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

## बांदोडा येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती

टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. २९ : सावित्रीबाई महिला मंडळ गोवा व बांदोडा रहिवासी यांच्या संयुक्त विद्यमाने बांदोडा येथे सावित्रीबाई फुले यांची १९४ वी जयंती साजरी करण्यात आल प्रमुख पाहुणे कृष्णा गावकर व प्रमुख वक्त्या मलिका माटे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली खास पाहुणे सतीश कोरगावकर यांनी शुभेच्छा दिल्या अर्चना पवार व मधु नाईक यांनी आपले विचार मांडले अध्यक्षा वासंती परवार यांनी महिला एक होण्याची गरज असल्याचे सांगितले.

## लाखणेश्वर देवस्थानात २ फेब्रुवारीला वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रम

टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २९ :** मुडकूड, आगोंद येथील श्री लाखणेश्वर देवस्थानचा वार्षिक वर्धापनदिन सोहळा रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी, मुडकूड देवस्थानात धार्मिक व सांस्कृतिक अशा विविध कार्यक्रमांनिशी साजरा करण्यात येईल. रविवार दि. २ रोजी, सकाळी ८ वाजल्यापासून लघुरुद्र, अभिषेक, आरती व हवन आणि दुपारी पूजाअर्चा, तीर्थ–प्रसाद तसेच महानैवेद्य आदी धार्मिक रिती रिवाजानुसार होणार आहे. रात्री ८ वा. महापुजा व तीर्थप्रसाद त्यानंतर आर्लां, केरी फोंडा येथील सार्थ कला अविष्कार व प्रशांती शिरोडकर प्रस्तुत दोन अंकी कोकणी विनोदी नाटक 'मावशी आमकां खावशी' हे नाटक सादर होईल. लेखक अक्षय शाणू वाघुर्मेकर, दिग्दर्शक गौतम अनंत गावडे, ध्वनी संकलन स्वप्नील नाईक, प्रकाश योजना अमर नाईक, रंगभूषा व वेशभूषा नम्रता सतरकर, प्रियंका नाईक शिरोडकर, करिष्मा नाईक, तेजा मणेरकर यांची आहे. या नाटकात भाग घेणारे कलाकार पुढील प्रमाणे आहेत. सुधीर केरकर, प्रशांती शिरोडकर, सनी नाईक आडपईकर, श्वेता खांडेपारकर व अक्षय वाघुर्मेकर आदी आहेत. भाविकांनी व रसीक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित रहाण्याचे आवाहन देवस्थान समितीतर्फे करण्यात आले आहे.

## शिवाजीराजे माध्यमिक विद्यालय येथे प्रजासत्ताक दिन साजरा

टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २९ :** खोलपेवाडी साळ येथील शिवाजीराजे पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात ७६वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक नागनाथ गोसावी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी निवृत्त शिक्षक दिलीप देसाई, पालक शिक्षक संघाचे अध्यक्ष फटी राऊत, सदस्य उमेश पिरणकर, सेजल नाईक व इतर शिक्षक, कर्मचारी वर्ग, माजी विद्यार्थी व विद्यार्थी यांनी झेंड्याला सलामी देऊन ध्वजगीत व राष्ट्रगीत गायिले. हा संपूर्ण कार्यक्रम शारीरिक शिक्षक नितीन नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडले तदनंतर विद्यालयाच्या सभागृहात विविधरंगी असे कार्यक्रम पार पडले. विद्यार्थी नम्रता राजपुरोहित, वेदांत वरदाने व शिक्षक शैलेश राऊत यांची भाषणे झाली. तसेच गटवार समुहगीत गायन स्पर्धेत हिरवा गट – प्रथम , निळा गट – द्वितीय , लाल गट – तृतीय विजेते ठरले, याचे परीक्षण नितीन नाईक व दिलीप देसाई यांनी केले. विविधता में एकता यावर राज्यवार प्रशिला परब, करिश्मा पालयेकर, लॅवेनिया लोबो, शैलेश राऊत, यांनी हिन्दी, इंग्रजी, व मराठी त विविध माहिती दिली तसेच शिक्षक नवराज अवखळे यानी श्वेत पटलावर चित्रफित आयोजित केली. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व व्यवस्थापन लाल गटाच्या विद्यार्थ्यांनी शैलेश राऊत, लॅवेनिया लोबो, करिश्मा पालयेकर, प्रशिला परब या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली केले. उपस्थितांचे स्वागत लोबो यांनी, सूत्रसंचालन रुची सावंत तर श्रृती पेडणेकर यांनी आभार मानले.



## विद्या व्रुद्धी स्कूल किडनेस्ट फोंडा येथे वार्षिक क्रीडा दिन

टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २८ :** फोंडा येथील क्रीडा संकुलात क्रीडा दिन साजरा करण्यात आला. इयत्ता पहिली ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धा आणि स्पर्धांमध्ये भाग घेऊन हा कार्यक्रम भव्यदिव्य ठरला. दिवसाची सुरुवात उद्घाटन समारंभाने झाली.

ज्यात प्रमुख पाहुणे म्हणून पांडुरंग बी. नाईक आणि नरेश गावणेकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. त्यांच्यासमवेत विद्या वृद्धी शाळेचे अध्यक्ष उदय डांगुई, मुख्याध्यापिका रुक्मी डांगुई, पीटीएच्या उपाध्यक्षा श्वेता नाईक आणि पीटीए कोषाध्यक्ष राघवेंद्र देसाई उपस्थित होते. ट्रॅक अँड फील्ड, सांघिक खेळ आणि वैयक्तिक स्पर्धांसह विविध क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन केले. सर्व वयोगटातील आणि क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची आणि स्पर्धा करण्याची संधी मिळावी यासाठी इव्हेंटचे वर्गवारीनुसार गट केले गेले. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी केलेले प्रभावी कवायत सादरीकरण हे दिवसाचे एक वैशिष्ट्य होते. विद्यार्थ्यांनी त्यांची शिस्त, समन्वय आणि सांघिक कार्य, त्यांचे कौशल्य दाखवून प्रेक्षकांचे मनोरंजन केले. दिवसाच्या शेवटी बक्षीस वितरण समारंभ झाला, मेजर जुगबीर सिंग (६ढढठ) आणि सुदेश नार्वेकर हे सन्माननीय पाहुणे होते. विविध कार्यक्रम आणि स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अनेक विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली. विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी खेळ, सांघिक कार्य आणि निरोगी स्पर्धेला प्रोत्साहन देण्यासाठी एकत्र येऊन क्रीडा दिनाचा सोहळा यशस्वी झाला. हा कार्यक्रम सर्वांगीण शिक्षण देण्याच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या शाळेच्या वचनबद्धतेचा पुरावा होता.

# तिलक वर्माची आयसीसी टी-२० क्रमवारीत मोठी झेप!

नवी दिल्ली, दि. २९ :

भारत आणि इंग्लंड यांच्यात सध्या पाच सामन्यांची टी–२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळली जात आहे. दरम्यान, आयसीसीने ताजी क्रमवारी जाहीर केली आहे. यावेळच्या टी–२० क्रमवारीत अनेक उलथापालथ दिसून येत आहेत. विशेषत: टीम इंडियाचा स्टार फलंदाज तिलक वर्माने इतिहास घडवला आहे. त्याने एका स्थानाने झेप घेतली असून, यासह त्याने आता दुसरे स्थान पटकावले आहे.

आयसीसीने जाहीर केलेल्या ताज्या क्रमवारीत ट्रॅव्हिस हेड पहिल्या क्रमांकावर आहे. त्याचे रेटिंग सध्या ८५५ आहे. दरम्यान, तिलक वर्मा एका स्थानावर झेप घेत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. त्याचे रेटिंग आता थेट ८३२ पॉइंट पर्यंत वाढले आहेत. तिलक वर्मा प्रथमच आयसीसी टी–२० क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यात चेन्नईमध्ये खेळल्या गेलेल्या दुसऱ्या सामन्यानंतर त्याने ८४४ ची रेटिंग मिळवले होते, पण तिसऱ्या सामन्यात स्वस्तात बाद झाल्याचा त्याला फटका बसला. असे असूनही तो आता ट्रॅव्हिस हेडच्या अगदी जवळ आला आहे.



दरम्यान, भारत विरुद्ध इंग्लंड मालिकेत आपल्या बॅटने चांगली कामगिरी करू न शकलेला इंग्लंडचा सलामीचा फलंदाज फिल सॉल्टला एका स्थानाचा फटका बसला आहे. तो आता ७८२ रेटिंगसह तिसऱ्या क्रमांकावर घसरला आहे. सध्या, टॉप–५ मध्ये हा एकमेव बदल आहे, परंतु तो खूप मोठा आहे. दरम्यान, भारताचा सूर्यकुमार यादव ७६३ रेटिंगसह चौथ्या क्रमांकावर आहे. त्याच्या क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही. जोस बटलर ७४९ रेटिंगसह पाचव्या क्रमांकावर कायम आहे. यानंतर बाबर आझम सहाव्या तर पथुम निसांका सातव्या क्रमांकावर आहे.

विशेष म्हणजे पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवानला न खेळता एका स्थानाचा फायदा झाला आहे, तर भारताचा यशस्वी जैस्वालही खेळला नाही, मात्र तो एका स्थानाने घसरला आहे. मोहम्मद रिझवान ७०४ रेटिंगसह ८ व्या क्रमांकावर तर यशस्वी जैस्वाल ६८५ रेटिंगसह ९व्या क्रमांकावर आहे. श्रीलंकेचा कुशल परेरा ६७५ रेटिंगसह दहाव्या क्रमांकावर कायम आहे.

# ज्योफ अलर्डिस यांचा आयसीसी, सीईओ पदाचा राजीनामा

नवी दिल्ली, दि. २९ :



ज्योफ अलर्डिस यांनी खउउ च्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) पदाचा राजीनामा दिला आहे. अलर्डिस चार वर्षे या पदावर राहिले. २०20 मध्ये मनू साहनी यांना पदावरून हटवल्यानंतर अलर्डिस यांनी अंतरिम आधारावर आठ महिने या पदावर काम केले होते. त्यानंतर नोव्हेंबर २०२१ मध्ये त्यांची या पदावर नियुक्ती झाली.

नव्या आव्हानांना तोंड देण्याची इच्छा त्यांनी नमूद केली. ते २०१२ पासून आयसीसीमध्ये कार्यरत आहेत, सुरुवातीला क्रिकेटचे महाव्यवस्थापक म्हणून, त्यापूर्वी त्याने क्रिकेट ऑस्ट्रेलियामध्येही काम केले.

अलर्डिस म्हणाले, आयसीसीचे सीईओ म्हणून काम करणे माझ्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे. क्रिकेटला जागतिक स्तरावर नेणे असो किंवा आयसीसी सदस्यांना आर्थिक लाभ मिळवून देणे असो, या काळात आम्ही जी उद्दिष्टे साध्य केली त्या सर्वांचा मला अभिमान आहे.

ते पुढे म्हणाले, गेल्या १३ वर्षांत मला दिलेल्या प्रचंड पाठिंब्याबद्दल मी आयसीसी अध्यक्ष, सर्व बोर्ड सदस्य आणि संपूर्ण क्रिकेट ग्रुपचा आभारी आहे. मला विश्वास आहे की आगामी काळ क्रिकेटसाठी रोमांचक असेल आणि यासाठी मी जागतिक क्रिकेट गटाला शुभेच्छा देतो.

त्यांच्या राजीनाम्यानंतर आयसीसी अध्यक्ष जय शाह यांनी लार्डाईस यांचे कौतुक केले आहे. शहा म्हणाले, आयसीसी बोर्डाच्या वतीने मी ज्योफ यांच्या योगदानाबद्दल त्यांचे आभार मानू इच्छितो. क्रिकेटला जागतिक स्तरावर नेण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली आहे. आम्हाला त्यांची सेवा मिळाल्याचा आनंद होत आहे आणि त्यांच्या भविष्यासाठी त्यांना शुभेच्छा.

# सम्राट क्लब पर्वरीतर्फे हास्य कवि संमेलन

टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. २९ :** सम्राट क्लब पर्वरीतर्फे आर्ट पार्क पर्वरी येथे बहुभाषिक हास्य कविसंमेलन झाले. बहुभाषिक कवि संमेलनात गोव्यातल्या आसपासचे कवि बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच कारवारहुनही कवि आले होते.

या कविसंमेलनाचे अध्यक्ष स्थानी ज्येष्ठ कवी माननीय दर्शन लोलयेकर होते. त्यांच्यासोबत सम्राट क्लबच्या अध्यक्षा सम्राट रिया राजन राणेतसेच सचिव सम्राट जया अनुज हरमलकर व सम्राट शिल्पा सांखळकर खजिनदार, तत्कालिन माजी अध्यक्ष देविदास नेतार्डेकर तशीच संमेलनाची आयोजिका सम्राट शीतल रामचंद्र साळगावकर व्यासपीठावर उपस्थित होते. शीतल साळगावकर यांनी सर्वांचे स्वागत केले. सम्राट रिया राणे हिने प्रास्ताविक भाषण केले. बहुभाषिक कवि संमेलनात कोकणी, मराठी, हिंदी, कन्नड, पेडणे बोली, कारवार बोली या सर्व भाषेचा कवि रसीक प्रेक्षकांनी दिलखुलासपणे आस्वाद घेतला.एकंदर वीस कविने विनोदी कविता आणीचारोळ्या सादर केल्या.



पर्वरी : हास्य कवि संमेलनाचे उद्घाटन करताना दर्शन लोलयेकर. बाजूला मान्यवर.

यात दर्शन लोलयेकर, अविनाश कुकळकर, जितेंद्र फडते, संतोष हरमलकर, अनघा कामत, सुनिता फडणीस, पौर्णिमा देसाय, श्रद्धा गंवडी, सुनिता पेडणेकर, शीतल साळगावकर, डॉ. आरती दिनकर हे कवी सहभागी होते. तसेच वर्षा/वनिता व संदेश बांदेकर हे खास कारवारहुन आले होते. तसेच शेखर खाडेपारकर मेधा करूदवाडकर विनंती कासार/कळंगुटकर माधुरी देवरे राजमोहन शेट्ये व नागरत्न कुडतरकर, या सगळ्या कवि कवयित्रीने वेगवेगळ्या विषयांवर आप आपल्या हास्य कविता सादर केल्या. अन् हास्यमय असेवातावरण निर्माण झाले. सम्राट प्रणीताढेकणे हिने कविसंमेलन अध्यक्ष दर्शन लोलयेकर यांची ओळखकेली आणी सम्राट शीतल साळगावकर हीने सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले.



काराय शिरोडा : ग्रंथालय व प्रयोगशाळेचे नूतनीकरण उद्घाटन डॉ. प्रफुल्ल हेदे. बाजूला चंद्रकांत हेदे, विकास पाटील, पुंडलिक पारकर, नीलेश नाईक, डॉ रामकृष्ण पारकर व इतर.

## कमलाबाई हेदे विद्यालयाच्या ग्रंथालय व प्रयोगशाळेचे अनावरण

टीम दैनिक हेराल्ड

बोरी, दि. २९ : काराय शिरोडा येथील श्रीमती कमलाबाई हेदे विद्यालयाच्या ग्रंथालय व प्रयोगशाळेचे नुतनीकरण करुन विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत सुविधायुक्त अशा इमारतीचे अनावरण गोव्यातील आघाडीचे उद्योजग डॉ. प्रफुल्ल हेदे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत हेदे, सन्मानिय अतिथी डॉ. रामकृष्ण पारकर, सचिव पद्मनाथ देसाई, उपाध्यक्ष पुंडलीक पारकर, खजिनदार, नीलेश शिरोडकर, व्यवस्थापक विज्वल प्रभुदेसाई, प्राचार्य जॅकसन रापोज, डॉ. गुडे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका संध्या प्रभूदेसाई, व्यवस्थापिका स्मिता कामत व श्रीमती कमलाबाई हेदे विद्यालयाचे मुख्याध्यापक विकास पाटील उपस्थित होते. नूतनिकरण केलेल्या ग्रंथालय व प्रयोगशाळेच्या विद्यार्थीअर्पण सोहळ्याचे उद्घाटन समई प्रज्वलनाने झाले त्यानंतर विद्यार्थ्यांनी माझी शाळा या विषयावर कविता व गाणी सादर केली.

याप्रसंगी उजस नाईक, अथर्व दळवी, कशिश गोसावी, इंनंतर शेख, रिया नाईक या विद्यार्थ्यांनी सहभाग दर्शविला. शिक्षिका शर्मिला गावणेकर यांनी आपल्या सुरेल स्वरात शाळेवर आधारित गीत सादर केले, त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. प्रफुल्ल हेदेनी विद्यालय व्यवस्थापन कमिटीचे कौतुक केले ते म्हणाले– शिरोडा गावातील या विद्यालयाची प्रगती नेत्रदिपक तर आहेच त्याचबरोबर विद्यालय व्यवस्थापन कमिटीच्या सांघिक प्रयत्नातून साधन– सुविधानी अद्ययावत अथा ईमारतीला आपलाही हातभार लागावा या हेतूने आपण रु. दोनलाखांचा धनादेश शाळेला अर्पण करीत आहे. त्यानंतर संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत हेदेनी व्यवस्थापक समितीच्या कार्याचा आढावा घेतला ते म्हणाले– मुलांमध्ये वाचन संस्कृती रुजावी व विद्यार्थी प्रयोगशिल व्हावा यास्तव शाळा व्यवस्थापन समितीने गेल्या काही वर्षात राबविलेल्या उपक्रमाला यशाचे गोमटे फळ प्राप्त झाले आहे. सर्वांच्या सहकार्यांतून हे विद्यालय अद्ययावत, समाजाभिमुख शैक्षणिक केंद्र बनुन शिरोड्याचा मानबिंदू ठरेल. त्यानंतर डॉ. पारकर यांनि मार्गदर्शनपर भाषण केले व रू. ५0 हजाराची आर्थिक मदतीची पूर्वप्राथमिक शाळेच्या विकासासाठी जाहिर केली. संपूर्ण कार्यंक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका जयमाला शिरोडकरनी केले तर आभार प्रदर्शन शलाका प्रभुदेसाईनी केले.

# मांद्रे येथे मिनी मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २९ :** यंदाच्या प्रजासत्ताक दिनी मांद्रे हायस्कूल मांद्रे व उदर्गत संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पेडणे व बार्देश तालुका मर्यादित डायमंड ज्युबिली प्रजासत्ताक मिनी मॅराथॉन स्पर्धा उत्साहात झाली. ही स्पर्धा तीन गटांमध्ये घेण्यात आली. १७ वर्षा खालील मुलगे (३कि.मी.) गटात अथर्व राव (मांद्रे) – प्रथम, आयुष काळोजी (केरी) – द्वितीय, गणपत सावळ (मांद्रे) – तृतीय, सोहम तळकर( केरी)– उत्तेजनार्थ प्रथम, व अर्जुन सावंत (मांद्रे) उत्तेजनार्थ दुसरे. शालेय मुली व महिला गट (३ कि.मी.) अश्वेता शिरोडकर (इब्राहीमपूर) – प्रथम, साची शिरोडकर (इब्राहीमपूर) – द्वितीय, दिक्षा सावळ (मांद्रे) – तृतीय, साक्षी सावंत (मांद्रे)–उत्तेजनार्थ प्रथम, व साक्षी वेंगुर्लेकर (केरी) –उत्तेजनार्थ दुसरे. १७ वर्षा वरील खुल्या गटात (५ कि.मी.) यश शिवा केरकर (केरी) – प्रथम, रोहित तळकर (केरी) – द्वितीय, आर्यन गाडी (कोरगांव) – तृतीय, अनिकेत परब (चोपडे) – उत्तेजनार्थ प्रथम, शशांक पार्सेकर (तुयें) – उत्तेजनार्थ दुसरे.



पेडणे : स्पर्धेला हिरवा बावटा दाखवताना आमदार जीत आरोलकर व इतर.

स्पर्धेचे उद्घाटन मांद्रेचे आमदार व गोवा गृह निर्माण मंडळाचे चेअरमन जीत आरोलकर यांच्या हस्ते शाळेचा झेंडा उंचावून करण्यात आले. स्वत:च्या व्यक्तिमत्व विकासासाठी विद्यार्थी व युवकांनी सर्वच क्षेत्रात योगदान देत सर्व गुण संपन्न बनले पाहिजे. निरोगी व तनदुरुस्त शरीर देश मजबूत करण्यासाठी उपयोगी ठरणारी दोन प्रमुख वैशिष्ट्ये आहेत, असे मत यावेळी जीत आरोलकर यांनी व्यक्त केले.

यावेळी झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमास मांद्रे हायस्कूलची मुख्याध्यापिका अपर्णा प्रभू, मांद्रे शिक्षण संस्थेचे चेअरमन केशव मांद्रेकर, सचिव शिवकुमार आरोलकर, खजिनदार बाळकृष्ण जोशी, संस्था सभासद सौरभ पार्सेकर व उमेश आजगांवकर उपस्थित होते. स्पर्धेची सर्व बक्षिसे उदर्गत संस्थेने पुरस्कृत केली. स्पर्धेत एकूण १९५ धावक सहभागी झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शारीरिक शिक्षक सोमनाथ पार्सेकर यांनी केले तर बक्षीस वितरण सूत्रसंचालन संदेश सावंत यांनी केले. आभार प्रदर्शन शेजल कलशांवकर हिने केले.

# स्टीव्ह स्मिथच्या कसोटीत १० हजार धावा पूर्ण

नवी दिल्ली, दि. २९ :

ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांच्यातील दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना २९ जानेवारीपासून गॅले आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जात आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. ट्रॅव्हिस हेड आणि उस्मान ख्वाजा यांनी डावाची सुरुवात दमदार केली. यानंतर मार्नस लबूशेन दुसऱ्या विकेट्सच्या रुपाने बाद झाल्यानंतर स्टीव्हन फलंदाजीला आला. त्याने आपले खाते उघडताच एक मोठा विक्रम केला आहे.

या सामन्यात स्टीव्हन स्मिथने प्रभात जयसूर्याचा चेंडूवर एकेरी धाव घेत कसोटी क्रिकेटमध्ये १०,००० धावा पूर्ण केल्या. कसोटीत १०,००० धावा करणारा स्मिथ ऑस्ट्रेलियाचा चौथा आणि एकूण १५ वा फलंदाज ठरला. स्मिथने ११५व्या कसोटी सामन्याच्या २०५व्या डावात ही मोठी कामगिरी केली. यासह स्मिथने सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविडसारख्या दिग्गजांचे मोठे विक्रम मोडीत काढले. स्मिथने ११५ सामन्यांमध्ये १०,००० कसोटी धावा पूर्ण केल्या, तर सचिन तेंडुलकरने हा टप्पा गाठण्यासाठी १२२ कसोटी सामने खेळले होते.



कसोटी डावांबद्दल बोलायचे झाले तर स्मिथने राहुल द्रविडपेक्षा कमी डावात १० हजार धावांच्या क्लबमध्ये प्रवेश केला. द्रविडने २०६ डावांमध्ये ही कामगिरी केली होती, तर स्मिथने २०५ डावांमध्ये १० हजार धावांचा आकडा गाठला आहे. सर्वात कमी डावात १० हजार कसोटी धावा करण्याचा विक्रम वेस्ट इंडिजचा महान फलंदाज ब्रायन लाराच्या नावावर आहे. लाराने १९५ डावांमध्ये १० हजार धावा केल्या आहेत.

### कसोटीत सर्वात जलद १० हजार धावांचा टप्पा पार करणारे खेळाडू

ब्रायन लारा– १११ सामने
कुमार संगकारा– ११५ सामने
स्टीव्हन स्मिथ– ११५ सामने
युनूस खान– ११६ सामने
रिकी पॉन्टिंग– ११८ सामने
जो रूट– ११८ सामने
राहुल द्रविड– १२0 सामने
सचिन तेंडुलकर– १२२ सामने

### कसोटी क्रिकेटमध्ये कमीत कमी डावात

१0 हजार धावा करणारा फलंदाज :ब्रायन लारा– १९५ डाव
सचिन तेंडुलकर– १९५ डाव
कुमार संगकारा– १९५ डाव
रिकी पाँटिंग– १९६ डाव
राहुल द्रविड– २0६ डाव

### कसोटीत १0 हजार धावा करणारे १५ फलंदाज

सुनील गावस्कर, लन बॉर्डर, स्टीव्ह वॉ, ब्रायन लारा, सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड, रिकी पाँटिंग, जॅक कॅलिस, महेला जयवर्धने, शिवनारायण चंद्रपॉल, कुमार संगकारा, लिस्टर कुक, युनिस खान, जो रूट आणि स्टीव्हन स्मिथ हे १५ खेळाडू आहेत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १४८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 148 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .